# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रिया २०१८-१९/२०१८/ 2233 दिनांक: 30 MAY 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,

पुणे विभाग.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशाकरिता सर्व व्यावसायिक पदविका/पदव्युत्तर पदविका/पदवी /पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या मान्यता व संलग्नीकरणाबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याबाबत

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२३अ/एडीएम/प्रवेश प्रक्रिया/२०१८/६६३ दिनांक २९.०५.२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्याने सदर प्रवेश प्रक्रिया बिनचूक व सुरळीतपणे पार पडण्याच्या दृष्टीने आपल्या संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद.नवी दिल्ली/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली/ कौन्सिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांचेकडून नवीन अभ्यासक्रमांना दिलेली मान्यता,सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ /घट,अभ्यासक्रम बंद करणे, अभ्यासक्रमांच्या नावातील बदल,संस्थेच्या नावातील बदल,को-एज्युकेशन बदल,संस्थेच्या स्थळातील बदल,संस्था बंद झाली असल्यास मान्यतेचे पत्र,अल्पसंख्यांक बदल,मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांना पुढे चालू ठेवण्याबाबतची परवानगी (EOA) इत्यादीबाबत शासनाने दिलेली मान्यता तसेच सदर अभ्यासक्रमांना संबंधित विद्यापीठाकडून अथवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचेकडून प्राप्त झालेले संलग्नीकरणाबाबतचे पत्र तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर आपल्या संस्थेच्या इन्स्टिट्यूट लॉग-इन केल्यानंतर Control Institute Menu – Upload Affiliation /Approval files द्वारे त्वरित अपलोड करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

सदर बदल केल्यानंतर संस्थेची संकेतस्थळावरील माहिती तपासून घेऊन ती बिनचूक असल्याची खात्री करावी .या शैक्षणिक वर्षापासून लॉग-इन करताना SMS व E-mail द्वारे लघुसंदेश पाठविण्यात येणार असल्याने संस्थाप्रमुखांनी त्यांचे भ्रमणध्वनी (Mobile) व ई-मेल संस्थेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावे. आपल्या लॉग-इनद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीसाठी आपण स्वतः जबाबदार राहाल याची नोंद घेण्यात यावी.या संदर्भात सुरक्षिततेच्या दृष्टीने प्राचार्यांनी पासवर्ड बदलविणे व तो गुप्त ठेवणे आवश्यक राहील याची प्रामुख्याने नोंद घ्यावी. सोबत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संदर्भिय पत्राची छायाप्रत सोबत जोडली आहे.

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

क्रमांक : २अ/एडीएम/प्रवेश प्रक्रिया/२०१८/ ६६३

दिनांक : 29 MAY 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशाकरीता सर्व व्यावसायिक पदविका/पदव्युत्तर पदविका/पदवी /पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या मान्यता व संलग्निकरणाबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याबाबत....

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असून सदर प्रवेश प्रक्रिया बिनचूक व सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या अधिनस्त कार्यरत संस्थांमध्ये सुरू असलेल्या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद,नवी दिल्ली, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, कॉन्सिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांचेकडून नवीन अभ्यासक्रमांना दिलेली मान्यता, सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ/घट, अभ्यासक्रम बंद करणे,अभ्यासक्रमाच्या नावातील बदल, संस्थेच्या नांवात बदल,संस्थेच्या स्थळातील बदल, संस्था बंद झाली असल्यास मान्यतेचे पत्र, अलपसंख्यांक बदल, को-एज्युकेशन बदल,मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांना पुढे चालू ठेवण्याबाबतची परवानगी (EOA) इत्यादीबाबत शासनाने दिलेली मान्यता तसेच सदर अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व संबंधित विद्यापिठाकडून प्राप्त झालेले संलग्नीकरणाबाबतचे पत्र आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सर्व व्यावसायिक पदविका/पदव्युत्तर पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थाना संचालनालयाच्या संकेतस्थळावर लॉगइन केल्यानंतर Control Institute Menu→Upload Affiliation/Approval files द्वारे त्वरीत अपलोड करण्याबाबत सूचित करण्यात यावे.

तसेच सर्व मान्यातप्राप्त संस्थांना असेही कळविण्यात यावे की, त्यांनी सदर बदल केल्यानंतर त्यांची संकेतस्थळावरील माहिती तपासून घ्यावी. या शैक्षणिक वर्षापासून लॉगइन करताना SMS व Email द्वारे लघूसंदेश पाठविण्यात येणार असल्याने संस्थाप्रमुखांनी त्यांचे भ्रमणध्वनी (Mobile) व ई-मेल वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावे व त्यांच्या लॉगईनद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीसाठी ते सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. या संदर्भात सुरक्षिततेच्यादृष्टीने प्राचार्यांनी पासवर्ड बदलविणे व तो गुप्त ठेवणे आवश्यक राहील याची प्रामुख्याने नोंद घेण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक २, १० मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहितीकरीता

\\192.168.1.9\Desk2a\2017-18\Affiliation correspondence\Letter to Universities.docx